# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग

दि.28/04/2025

## प्रेस नोट

वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत आहे कि, सन २०२५-२६ या वित्तीय वर्षाची मालमत्ता कर देयके वितरणाची कार्यवाही सुरु आहे. ज्या मालमत्ता धारकांना देयक प्राप्त करून घ्यावयाचे असेल त्या मालमत्ता धारकांनी महानगरपालिकेच्या www.vvcmc.in या सांकेतिक स्थळावर तसेच प्रभाग समिती कार्यालयात भेट देऊन मोफत मालमत्ता कर देयक उपलब्ध करून घ्यावीत. मुदतीत मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात (सामान्य करात) महानगरपालिके मार्फत विशेष सुट जाहीर करण्यात आलेली आहे ती खालीलप्रमाणे:

| सूटचा तपशील | |
|---|---|
| कालावधी | सूटचा दर (सामान्य करात) |
| १ एप्रिल २०२५ ते ३० जून २०२५ पर्यंत | ५% |
| १ जुलै २०२५ ते ३१ जुलै २०२५ पर्यंत | ३% |

नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेच्या सांकेतिक स्थळावर मालमत्ता कर देयाकाचे अवलोकन करणे, डाऊनलोड करणे तसेच ऑनलाईन पद्धतीने (गुगल पे, फोन पे, पे टी.एम., नेट बँकिंग इत्यादी) कर भरणा करणे इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

सर्व मालमत्ता धारकांनी आपल्या मालमत्ता कारचा भरणा मुदतीत करून वरील सवलतीचा लाभ घ्यावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

मालमत्ता कर विभाग
वसई-विरार शहर महानगरपालिका